**गोपीनाथ मुंडे शेतकरी- अपघात विमा योजना राबविण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपद्धती व मार्गदर्शक सुचना**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक: शेअवि- २०१८/प्र.क्र. १९३/ ११ अे**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - १९ सप्टेंबर, २०१९

**संदर्भ** :- कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,शासन निर्णय क्रमांक: शेअवि २०१८/प्र.क्र.१९३/११ अे ,दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९

**प्रस्तावना :-**

शेती व्यवसाय करतांना होणारे विविध अपघातामुळे शेतकऱ्यांस मृत्यू ओढावल्यास किंवा अपंगत्व आल्यास सद्या संबंधित अपघातग्रस्त शेतकऱ्यांस विमाछत्र गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमार्फत प्रदान करण्यात आले असून त्याचा लाभ त्या शेतकऱ्यास व त्यांच्या कुटुंबास देण्यात येतो.

प्रचलित गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत शेतकऱ्याचे कुटुंब विमाछत्राखाली येत नसल्यामुळे सदर योजनेची व्याप्ती वाढवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांस व त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्याच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पती/पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वयोगटातील एकुण २ जणांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून योजनेसंदर्भात यापुर्वी निर्गमित करणेत आलेले शासन निर्णय/ परिपत्रके अधिक्रमित करण्यात आले आहेत. सबब, सुधारीत स्वरुपातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपद्धती व मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक :-**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचे कल्याणकारी स्वरूप विचारात घेऊन ही योजना सुधारीत स्वरुपात राबविण्यासाठी योजनेच्या कार्यवाहीबाबत पुढील प्रमाणे मार्गदर्शक

सुचना निर्गमित करण्यात येत आहे:-

१. राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व त्याबरोबरच शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही १ वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले व्यक्ती (आई-वडील, शेतकऱ्याची पती/पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वयोगटातील एकुण २ जणांना विमाछत्र प्रदान करण्यासाठी सुधारित स्वरुपात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजनेसाठी विमाछत्र प्रदान करण्यासाठी कुटुंबाच्या व्याख्येमध्ये शेतकऱ्याचे आई-वडील, पती/पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यांचा समावेश ग्राह्य धरण्यात यावे.

३. **<u>योजनेंतर्गत विमा संरक्षण</u>** - सदर योजनेअंतर्गत अपघात ग्रस्त शेतकऱ्यांना /त्यांच्या कुटुंबियांस प्रकरणपरत्वे खालील प्रमाणे लाभ अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | अपघाताची बाब | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १ | अपघाती मृत्यू | रु.२,००,०००/- |
| २ | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय तसेच एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास | रु.२,००,०००/- |
| ४ | अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास | रु.१,००,०००/- |

४. **<u>योजना कार्यान्वयीन यंत्रणा</u> :**

आयुक्त (कृषि) यांचे मार्फत ई निविदा प्रक्रीया राबवून महसूल विभागनिहाय विमा कंपनी/कंपन्या व विमा सल्लागार कंपनी/कंपन्यांची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून त्या त्या महसूल विभागासाठी ठराविक कालावधीसाठी राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येईल.

५. **<u>लाभार्थी पात्रता :-</u>**

महाराष्ट्र राज्यातील १० ते ७५ वयोगटातील महसूल नोंदी नुसार विमा पॉलिसी लागू झालेल्या तारखेस खातेदार असलेला शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेला उक्त मुददा क्र.२ अन्वये शेतकऱ्याच्या कुटुंबातील १० ते ७५ वयोगटातील कोणताही १ सदस्य.

## ६. <u>दावा अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे :-</u>

### अ) लाभ घेण्याकरीता दावा दाखल करताना सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे -

१) विहीत नमुन्यातील पूर्वसूचनेचा अर्ज (सहपत्र क्र.१)
पूर्वसूचनेसोबत आवश्यक कागदपत्रे

- ७/१२ उतारा,
- मृत्यू दाखला,
- प्रथम माहिती अहवाल,
- विजेचा धक्का अपघात,वीज पडून मृत्यू,पाण्यामध्ये बुडून मृत्यू,उंचावरुन पडून झालेला मृत्यू,सर्पदंश/विंचू दंश व अन्य कोणतेही अपघात यासाठी प्रथम माहिती अहवाल किंवा पोलीस पाटील अहवाल,
- घटनास्थळ पंचनामा,
- वयाचा दाखला,

<u>सदरचा दावा दुर्घटनेनंतर शक्यतो ४५ दिवस कालावधीत नोंदवण्यात यावा.</u>

२) विहीत नमुन्यातील अर्ज (सहपत्र क्र.१) सदर अर्जासोबत प्रस्तावासाठी अपघाताच्या प्रकारानुसार आवश्यक सर्व कागदपत्रे सहपत्रित करण्यात यावी.अप्राप्त कागदपत्रांची यादी त्रुटीपत्रकात तालुका कृषि अधिकारी कार्यालयात नोंदवहीत,संगणक प्रणालीमध्ये पडताळणी करून नोंदवण्यात यावी.

३) अपघातग्रस्ताच्या वयाच्या पडताळणीकरीता जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र/ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र किंवा आधार कार्ड किंवा पॅन कार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना किंवा पारपत्र यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र किंवा उपलब्ध नसल्यास निवडणूक ओळखपत्र (स्वयंसांक्षाकीत केलेले).

४) अपघातग्रस्त नोंदणीकृत खातेदाराच्या वयासंबंधी वरीलपैकी कोणताही पुरावा उपलब्ध होऊ न शकल्यास विमा दावेदाराने/कुटुंबातील सदस्याने अपघातग्रस्त खातेदाराच्या वयासंबंधी शपथपत्र दिल्यास असे शपथपत्र ग्राहय धरण्यात येईल.

५) खातेदार शेतकरी कुटुंबाची शिधापत्रिका राजपत्रित अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेली प्रत.

६) शेतकरी म्हणून त्याचे नावाचा समावेश असलेला ७/१२ किंवा ८-अ नमुन्यातील मूळ उतारा.

७) मृत्युचा दाखला स्वयंसांक्षाकीत केलेली प्रत.

८) घटनास्थळ पंचनामा स्वयंसांक्षाकीत केलेली प्रत.

९) प्रस्ताव प्राप्त झाल्यावर पडताळणी करतांना तालुका कृषि अधिकारी कार्यालय स्तरावर मुळ कागदपत्रे तपासून सदर प्रमाणपत्रे सांक्षाकीत करावीत.

**आ) प्रस्तावासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे**

१) ज्या नोंदीवरुन अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव ७/१२ वर आले असेल अशी सबंधीत फेरफार नोंद (गाव नमुना नंबर ६-ड) मूळ उतारा अथवा फेरफार नोंदीबाबत सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र

२) शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गांव नमुना नं. ६ क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद. मूळ उतारा अथवा वारसाच्या नोंदीबाबत सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र

३) विहीत नमुन्यातील कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-ग).

४) या शिवाय अपघाताच्या घटनेच्या स्वरुपानुसार **पुराव्यादाखल सादर करावयाच्या प्रपत्र क मधील कागदपत्रे**

६.१ या शासन परिपत्रकान्वये विहित केलेली प्रपत्रे /कागदपत्रे वगळता अन्य कोणतीही कागदपत्रे शेतकऱ्यांना वेगळ्याने सादर करण्याची आवश्यकता नाही किंवा या योजनेअंतर्गत लाभासाठी विमा कंपनीकडे स्वतंत्रपणे अर्ज /कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अपवादात्मक परिस्थितीमध्ये, विमा प्रस्ताव सोबत काही कागदपत्रे सादर करावयाची राहिल्यास पर्यायी कागदपत्रे/ चौकशीच्या आधारे प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा. यासाठी आवश्यकता वाटल्यास शासनाच्या वतीने आयुक्त (कृषी ) ,विमा सल्लागार कंपनी / कंपन्या व विमा कंपनी /कंपन्या यांनी संयुक्तपणे निर्णय घ्यावा.

६.२ विमा दाव्याचे अनुषंगाने पूर्वसुचना अर्ज विहित कागदपत्रांसह ज्या दिनांकास तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयात दाखल /प्राप्त होईल व संगणक प्रणालीमध्ये अपलोड होईल त्या दिनांकासच तो विमा कंपनीस प्राप्त झाला आहे असे समजण्यात येईल.

६.३ विमा प्रस्ताव विहित कागदपत्रांसह योजनेंतर्गत विमा संरक्षित कालावधीत कधीही प्राप्त झाला तरी तो विचारात घेणे तसेच योजनेच्या अखेरच्या दिवसात झालेल्या अपघातांसाठी योजनेचा चालू वर्षाचा मंजूर कालावधी संपल्यानंतर ९० दिवसांपर्यंत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील.शिवाय योजनेचा चालू वर्षाचा मंजूर कालावधी संपल्यानंतर ९० दिवसांपर्यंत संगणक प्रणालीमध्ये नोंद झालेल्या पूर्वसुचना अर्जान्वये तालुका कृषि अधिकारी यांचेकडे प्राप्त होणारे विमा प्रस्तावसुध्दा विमा पॉलिसीचा कालावधी संपल्याच्या दिवसापासून ३६५ दिवसांपर्यंत स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील. मात्र सदर कालावधीनंतर कोणताही प्रस्ताव स्विकारला जाणार नाही. तसेच यासंदर्भात ग्राहक मंच किंवा इतर निर्णय/आदेश शासनावर बंधनकारक राहणार नाहीत.

## ७. योजनेची कार्यपद्धती व संबंधितांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या

(अ) **अर्जदार :-**

१. अपघात झाल्यानंतर त्वरित योजनेंतर्गत पूर्वसूचनापत्र/नोंदणी करीता विहित नमुन्यात - क्लेम फॉर्म भाग १ सोबत,वरील मुद्या क्र.६ अ नुसार नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.तसेच वरील मुद्या क्र.६ आ नुसार नमूद केलेली अपघाताच्या

स्वरूपानुसार अपघाताचे पुराव्यासंबंधीच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव विमा संरक्षित कालावधीत सादर करावा.

२. लाभासाठीचा दावा शक्यतो ४५ दिवस कालावधीत नोंदवण्यात यावी.

३. तसेच वरील मुद्दा क्र.६ आ नुसार नमूद केलेली अपघाताच्या स्वरूपानुसार अपघाताचे पुराव्यासंबंधीच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव विमा संरक्षित कालावधीत सादर करावा.

**(ब) <u>महसूल यंत्रणा :-</u>**

**<u>तलाठी :</u> -** अपघात ग्रस्त शेतकरी /वारसदार/ संबंधित कृषी पर्यवेक्षक यांना ७/१२ चा उतारा आणि गाव नमुना ६- क व ६ - ड अथवा सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे फेरफार नोंदीबाबत / वारसाच्या नोंदीबाबत प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून द्यावे.

**<u>तहसीलदार :</u>**

१. योजनेसंबंधी माहिती /अर्जाचा नमुना सेतू कार्यालयातून पुरवावा.सदर अर्जाचे नमुने संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करण्यात येतील.
२. अर्जदारास लागणारे उतारे, वारस नोंद व तलाठी प्रमाणपत्र अर्जदारास तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना संबंधितांना निर्गमित कराव्यात.
३. प्रत्येक महिन्यात किमान एकदा प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन महसूल विभागाकडील कागदपत्रांच्या अभावी कोणतेही प्रकरण प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**<u>जिल्हाधिकारी :</u>**

१. जिल्हा सनियंत्रण समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी यांनी योजनेचा प्रत्येक तीन महिन्यात तालुकानिहाय आढावा घ्यावा व अडचणींचे निराकरण करावे.
२. महसूल विभागाची कागदपत्रे (७/१२ चा उतारा, गाव नमुना ६- क व ६ - ड / सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे फेरफार नोंदीबाबत / वारसाच्या नोंदीबाबत प्रमाणपत्र ),तलाठी प्रमाणपत्र; तलाठी तसेच पोलिस विभाग,आरोग्य विभागाकडून विमा प्रस्तावातील विहित कागदपत्रे मिळण्यास अडचणी असल्यास त्यानुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून प्राधान्यक्रमाने कागदपत्रांची पूर्तता करण्याचे निर्देश द्यावेत.
३. योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेचे दृष्टीने सुधारणा/ सूचना याबाबत आयुक्त (कृषी) यांना अवगत करावे.

**(क) <u>कृषी विभाग :-</u>**

**<u>कृषी पर्यवेक्षक</u> :**

१. सदर योजनेचे प्रयोजनार्थ क्षेत्रीय स्तरावरील सर्व कृषी पर्यवेक्षक यांना दावा /प्रस्ताव सादरकर्ता प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.
२. तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी यांचे अधिनस्त क्षेत्रीय काम करणारे कृषी पर्यवेक्षक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील दुर्घटने संदर्भात पूर्वसूचना प्राप्त होताच संबंधित दुर्घटनाग्रस्त शेतकरी व मृत शेतकऱ्यांचे वारसदार यांचेशी संपर्क साधावा व अर्जाच्या विहित नमुन्यात माहिती

शेतकऱ्यांकडून संकलित करण्यासाठी व संबंधित शासकीय यंत्रणांशी समन्वय ठेवून कागदपत्रे उपलबद्धतेबाबत शेतकरी कुटुंबास मदत करावी.

३. अर्ज स्वीकारते वेळी प्रस्तावासोबत ७/१२ चा उतारा, गाव नमुना ६- क , ६ -ड, प्रतिज्ञापत्र हे मूळ प्रतीत व उर्वरित कागदपत्रे स्वयंसाक्षांकीत केली असल्याची खात्री करावी व नसल्यास पूर्तता करून घेऊन अर्ज स्वीकारावा. अपूर्ण अर्जामधील त्रुटि बाबत तशी नोंद घेऊन पोहच पावती तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून संबंधित शेतकरी/वारसदारला देण्यात यावी.

४. अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखादे कागदपत्राअभावी प्रस्ताव परिपूर्ण होत नसल्यास प्रस्ताव दाखल करून घेऊन, या संदर्भात ब्रोकर/विमा कंपनीच्या सल्ल्यांनी पर्यायी कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यास सहकार्य करावे.

**<u>तालुका कृषी अधिकारी</u> :**

१. योजनेची प्रसिद्धी करण्यास मदत करावी.

२. योजनेसंबंधी माहिती /अर्जाचा नमुना पुरवावा.

३. कृषी पर्यवेक्षक यांनी सादर केलेला अर्ज स्वीकारावा व अर्ज स्वीकारताना प्रस्तावासोबत ७/१२ चा उतारा, गाव नमुना ६- क व ६ - ड मुळप्रतीत व उर्वरित कागदपत्रे स्वयंसाक्षांकीत केलेली असल्याची खात्री करावी, नसल्यास पूर्तता करून घेऊन अर्ज स्वीकारावा व पोहोच द्यावी.

४. कृषी पर्यवेक्षक यांनी सादर केलेल्या अर्जाची छाणनी करावी. सदर अर्जामध्ये एकापेक्षा जास्त वेळा त्रूटी काढण्यात येऊ नये.

५. कार्यालयास प्राप्त झालेल्या पूर्वसुचना अर्ज व प्रस्तावांची संगणक प्रणालीमध्ये नोंद करणे.

६. प्राप्त दावे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालयात सादर करून रीतसर पोहोच घ्यावी.

७. योजनेचा नियमीतपणे आढावा घेणे व त्रुटीपुर्ततेसाठी पाठपुरावा करणे.

८. खालीलप्रमाणे विहित नमुन्यात (प्रपत्र-इ) वर्षनिहाय प्रकरणांच्या अदयावत नोंदी ठेवाव्यात.

**(प्रपत्र-इ)**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

विहित नमुन्यात प्रकरणांच्या नोंदी ठेवणे (तालुकास्तर) सन २०१९-२०

| अ.क्र | अपघातग्रस्ताचे नाव ,वय व पत्ता | शेतकरी स्वत: /कुटुंबातील सदस्य (नाते) | अपघाताचे स्वरुप | अपघाताचा दिनांक | विमा प्रस्ताव प्राप्त दिनांक | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात पाठविल्याचा दिनाक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

९. विहित कागदपत्रांचे त्रुटींमुळे परत आलेल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करून घेऊन परिपूर्ण प्रस्ताव फेरसादर करावा.
१०. दावा नामंजूरी संदर्भात विवाद निर्माण झाल्यास जिल्हा संनियंत्रण समितीकडे तक्रार दाखल करण्यास संबंधितांना मार्गदर्शन करावे.
११. विमा कंपनीने मंजूर केलेल्या प्रस्तावाची नुकसान भरपाईची रक्कम संबंधित शेतकऱ्याचे /वारसदारांचे बँक खात्यात जमा झाले बाबत खातरजमा करावी यासाठी संबंधित कंपनीकडे नियमित पाठपुरावा करावा.

<u>उपविभागीय कृषी अधिकारी:</u>

१. अधिनस्त तालुक्यातील विमा प्रस्तावांचा प्रत्येक दोन महिन्यातून किमान एकदा आढावा घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाही करावी.
२. विविध कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी प्रलंबित राहणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करून कागदपत्रे प्राप्त करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

<u>जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी:</u>

१. विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधीस कार्यालयात जागा उपलब्ध करून द्यावी.
२. योजनेच्या कामासाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील एका अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नियुक्ती करावी. सदर अधिकारी किंवा कर्मचारी यांनी विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधींसमवेत योजनेचे कामकाज करावे.
३. तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून आलेल्या विमा प्रस्तावांच्या नोंदी विहित नमुन्यात ( प्रपत्र - फ) ठेवाव्यात.
४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाची छाणनी करावी. सदर अर्जामध्ये एकापेक्षा जास्त वेळा त्रृटी काढण्यात येऊ नये.
५. विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत विमा कंपनी, लाभार्थी अथवा शासकीय यंत्रणा यामध्ये वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत समाधानकारक तोडगा काढण्यासाठी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सनियंत्रण समिती गठीत करावी.
६. आवश्यकतेनुसार विमा सल्लागाराच्या सल्यानुसार विमा कंपनीने नामंजूर केलेल्या प्रकरणाची पुनः फेरविचारार्थ विमा कंपनीस आदेशीत करणे.
७. योजनेचे संकेतस्थळावरील नोंदी अद्ययावत राहतील यानुषंगाने जिल्हास्तरावर संनियंत्रण व उपलब्ध डॅशबोर्ड च्या तपशीलावरून योजनेचे संनियंत्रण करणे.

**प्रपत्र फ**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

विहित नमुन्यात प्रकरणांच्या नोंदी ठेवणे (जिल्हास्तर) सन २०१९-२०

| अ.क्र | अपघातग्रस्ताचे नाव, वय व पत्ता | शेतकरी स्वत: /कुटुंबातील सदस्य (नाते) | अपघाताचे स्वरुप | अपघाताचा दिनांक | विमा प्रस्ताव ता.कृ.अ. कार्यालयाकडून प्राप्त दिनांक | विमा सल्लागार कंपनीस प्रस्ताव सादर दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

८. जिल्हा सनियंत्रण समितीचे सदस्य सचिव म्हणून शक्यतो दरमहा आढावा बैठक आयोजित करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

९. जिल्ह्यात योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची राहील.

१०.विमा सल्लागार कंपनीने अपूर्ण प्रस्तावांची यादी त्रुटींसह जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना सादर केल्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून तात्काळ कागदपत्रांची पूर्तता करून संबंधित विमा सल्लागार कंपनीचे विभागीय कार्यालयास सादर करणेबाबत सनियंत्रण करावे.

११.विमा कंपनी /विमा सल्लागार कंपनीकडून दावे मंजुरी/नामंजुरीबाबत प्राप्त माहिती तालुका अधिकारी कृषी अधिकारी यांना द्यावी.

१२.न्यायालयीन प्रकरणी दाव्यांचे कामकाज पाहण्यासाठी शासनाचे वतीने संपूर्ण कार्यवाही करणेसाठी “सक्षम प्राधिकारी”म्हणून,तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच येथे दाखल केल्या जाणा-या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच येथे कॅव्हेट दाखल करणेसाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>विभागीय कृषी सहसंचालक:</u>**

१. विभागातील योजनेची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी विभागीय कृषी सहसंचालक यांची राहील.

२. शासन निर्णयानुसार विभागस्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनी यांनी कार्यालय कार्यान्वीत केलेची खातरजमा करावी.

३. संबंधित विमा सल्लागार कंपनी, विमा कंपनी व विभागातील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे समवेत दरमहा आढावा बैठक घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संनियंत्रण करावे व अहवाल आयुक्त (कृषि) यांना सादर करावेत.

**<u>आयुक्त (कृषी):-</u>**

१. आयुक्त (कृषी) विमा सल्लागार कंपनी, विमा कंपनी निवड करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

२. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मदतीने संगणक प्रणाली विकसीत करुन ती अद्यावत ठेवणे.
३. आयुक्त (कृषी) यांनी विमा सल्लागार कंपनी, विमा कंपनी व विभागीय कृषी सहसंचालक यांचेकडून योजनेचा मासिक प्रगती अहवाल घेऊन योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी सनियंत्रण करावे व योजनेच्या प्रगतीबाबत शासनास वेळोवेळी अवगत करावे.
४. योजनेच्या कालावधीत आयुक्त (कृषी) यांनी योजनेच्या प्रगतीचा **मासिक** आढावा घ्यावा. सदर आढावा घेताना विमा कंपनीकडे दाखल झालेले दावे, त्यापैकी निकालात काढलेले दावे, नाकारलेले दावे, दावे प्रलंबित राहण्याची कारणे, प्रलंबित दावे निकाली काढण्यासाठी संबंधित विमा कंपनीने केलेले प्रयत्न, त्यांच्या कार्यालयाकडून शेतकऱ्यांना मिळणारा प्रतिसाद, योजनेच्या प्रसिद्धीसाठी तसेच दावे निकाली काढण्यासाठी आखलेली मोहीम, अथवा विशेष प्रयत्न इत्यादी गोष्टी विचारात घ्याव्यात.

**(ड) विमा सल्लागार कंपनी :**

१. योजनेत सहभागासाठी विमा सल्लागार कंपनीचे विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यालय असणे आवश्यक आहे.नसल्यास योजनेंतर्गत निवडीबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आंत कार्यालय कार्यान्वीत करणे बंधनकारक राहील.
२. योजनेत भाग घेण्यासाठी विमा सल्लागार कंपनीकडे टोल फ्री क्रमांक कार्यान्वित असणे बंधनकारक आहे.
३. शासन नियुक्त विमा सल्लागार कंपनीने शासनास ब्रोकरेज रकमेच्या २५ टक्के बँक गॅरंटी देणे अनिवार्य राहील.
४. विमा योजनेची प्रसिद्धी विमा कंपनीच्या समन्वयाने करावी.
५. कृषि पर्यवेक्षक, तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यासाठी विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे सहकार्याने व विमा कंपनीच्या समन्वयाने जिल्हा स्तरावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्ग आयोजीत करावा.
६. प्रशिक्षणाचा जिल्हानिहाय अहवाल बुकलेट स्वरुपात आयुक्त (कृषी) यांना सादर करावा.
७. तसेच विमा सल्लागार कंपनीने एका कर्मचाऱ्याची नियुक्ती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालयात करणे बंधनकारक राहील.संबंधिताने जिल्हा स्तरावर प्राप्त होणारी त्रुटीपुर्ततेबाबतची कागदपत्रे संगणक प्रणालीमध्ये अपलोड करावीत तसेच सदर कर्मचाऱ्याने विमा प्रस्तावाची तपासणी करावी. विमा प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करून घेऊन परिपूर्ण विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करावा आणि अपूर्ण विमा प्रस्तावाबाबतची यादी विमा कंपनीला कळवून विमा दावे मुदतबाह्य होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त विमा प्रस्ताव विमा सल्लागार कंपनीच्या कर्मचा-याने तपासून रितसर पोहच द्यावी तसेच अपूर्ण कागदपत्रांसंबंधी लेखी सूचना द्यावी.

९. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सादर केलेल्या अर्जाची छाणनी करावी. सदर अर्जामध्ये एकापेक्षा जास्त वेळा त्रृटी काढण्यात येऊ नये.
१०.विमा सल्लागार कंपनीने संगणक प्रणालीमध्ये तपशील जसे की,प्रस्ताव मंजूर / नामंजूर / त्रृटी / युटीआर क्र.इ.नियमितपणे अद्यावत करावा.
११.विमा प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ७ दिवसात तपासणी/पडताळणी करुन परिपूर्ण प्रस्ताव संबंधित विमा कंपनीकडे मंजूरीसाठी सादर करावेत.
१२.विमा सल्लागार कंपनीने त्यांच्याकडे प्राप्त होणारे प्रस्ताव तपासून परिपूर्ण प्रस्तावच संबंधित विमा कंपनीकडे मान्यतेसाठी सादर करावेत. विमा सल्लागार कंपनीने विमा कंपनीकडे पाठविलेले प्रस्ताव मंजूर करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी विमा सल्लागार कंपनीची राहील.
१३.विमा सल्लागार कंपनीने विमा कंपनी समवेत दरमहा योजनेचा आढावा घ्यावा व प्रलंबित प्रकरणांची यादी व मासिक प्रगती अहवाल आयुक्त (कृषी)/ विभागीय कृषी सहसंचालक/ संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी /तालुका कृषी अधिकारी यांना सादर करावा. याबाबतीत सर्व प्रस्तावांची तालुका /जिल्हानिहाय माहिती अद्यावत ठेवण्याची जबाबदारी विमा सल्लागार कंपनीची राहील. या योजनेसाठी शासन स्तरावरुन संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेचे विचाराधीन आहे.तथापि सदर संगणक प्रणाली कार्यान्वीत होईपर्यंत विमा सल्लागार कंपनीने या योजनेसाठी विकसित केलेली संगणक प्रणाली वापरण्यात येईल.
१४.विमा सल्लागार कंपनीने सादर केलेला प्रस्ताव विमा कंपनीने विहित **२१ दिवसाच्या मुदतीत** तपासून पडताळणीच्या नोंदी विमा संगणक प्रणालीवर विमा कंपनीकडून नोंदवल्या जातील याची खात्री करावी. तसेच आवश्यकतेनुसार दंडात्मक कार्यवाहीसाठी या नोंदीच्या आधारे कार्यवाहीसाठी पाठपुरावा करावा.
१५.विमा प्रस्तावासंदर्भातील त्रृटी,मंजुरी वा नामंजुरीबाबतचा प्रगती अहवाल विभागीय कृषी सहसंचालक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देऊन अर्जदारास स्वतंत्रपणे लेखी कळवावे. या संदर्भात संगणक प्रणालीमार्फत शेतकरी कुटुंबास टेक्स्ट मेसेज व प्रशासनास ईमेल द्वारे अर्ज स्थिती कळविण्याची सुविधा कार्यान्वित करण्यात यावी.
१६.सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये अडचण /संदिग्धता निर्माण झाल्यास सदरची बाब वेळीच शासनाच्या निदर्शनास आणून देऊन अडचणीचे निराकरण करण्यासाठी शासनाशी /आयुक्त (कृषी) यांच्याशी सल्लामसलत करावी.
१७.विमा कंपनी विमा योजनेची अंमलबजावणी कराराप्रमाणे करीत आहे याबाबत विमा सल्लागार कंपनीने दक्षता घ्यावी.
१८. योजनेच्या प्रगतीबाबत मासिक आढावा घेऊन अंमलबजावणीत काही उणीवा आढळल्यास त्या दूर कराव्यात व त्याबाबत शासनास व आयुक्त (कृषी) यांना वेळोवेळी अवगत करावे.
१९.वादग्रस्त प्रकरणी विमा कंपनी व जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती बरोबर समन्वय साधून चर्चेद्वारे वेळोवेळी निराकरण करावे व संबंधितांना विम्याचा लाभ विहित कालमर्यादेत मिळवून देण्यासाठी मदत करावी.

२०.विमा संरक्षित कालावधी संपल्यानंतर सर्व विमा प्रस्ताव निकाली निघेपर्यत या कामासाठी विभागीय स्तरावर एका कर्मचा-याची नियुक्ती करावी.सदर कर्मचा-याने प्राप्त प्रस्तावातील प्रलंबित कागदपत्रांचे पुर्ततेसाठी संबंधित अर्जदार व यंत्रणेकडे सतत लेखी पाठपुरावा करावा.

२१.विमा कंपन्यांनी विमा प्रस्तावांना मंजूरी देण्यास टाळाटाळ केल्यास विमा प्रस्ताव निकाली निघण्यासाठी आवश्यकतेनूसार खालील मार्गाचा अवलंब करावा.

१) अनिर्णित विमा प्रस्ताव जिल्हा स्तरावरील जिल्हा संनियंत्रण समिती/तक्रार निवारण समितीसमोर सादर करावेत.

२) समितीच्या निर्णयाची वाट न पाहता विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर झाल्यानंतर तीन महिन्यांनी विमा कंपनीच्या तक्रार निवारण कक्षाकडे (**Dispute** Redressal Machinary) दावा दाखल करावा.

३) आवश्यकतेनुसार विमा नियामक प्रधिकरण (IRDA) व विमा न्यायाधीश (Ombudsman) यांचेकडे दावा दाखल करावा.

४) जिल्हा,राज्य व राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवरण मंच येथे दाखल करुन प्रलंबित विमा प्रस्ताव निकाली काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही/प्रयत्न करावेत.

५) विमा प्रस्तावासंबंधी शेतक-याने न्यायालयात दावा दाखल केल्यास राज्य शासन/आयुक्त (कृषि) यांना प्रतिवादी केले जाते.अशावेळी विमा सल्लागाराने कायदेशीर बाबीसाठी होणारा आवश्यक खर्च करावा. तसेच सर्व प्रलंबित विमा प्रस्ताव निकाली काढण्यासाठी उचित कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी होणारा खर्च विमा सल्लागार कंपनीने करावा.त्यासाठी शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य दिले जाणार नाही.

२२.**विमा सल्लागार कंपनीने दिलेल्या बँक गॅरंटीची ९० टक्के रक्कम,विमा कंपनीकडे सादर केलेली १०० टक्के प्रकरणे निकाली निघणे किंवा २४ महिने यापैकी जे आधी होईल तेव्हा मुक्त करण्यात येईल व उर्वरीत १० टक्के रक्कम विमा कंपनीकडील सर्व प्रकरणे निकाली निघाल्यानंतरच मुक्त करण्यात येईल.**

२३.**वरीलप्रमाणे कोणत्याही अटी-शर्तीचे,करारनामा व सामंजस्य करारातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास बँक गॅरंटी रकमेमधून दंड आकारण्याचे अंतिम अधिकार राज्य स्तरीय समितीस राहतील.**

<u>विमा कंपनी :</u>

१. त्रिपक्षीय करार केल्यानंतर विमा कंपनीने विमा पॉलिसी तात्काळ निर्गमित करावी.

२. विमा कंपनीचे विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यालय असावे,नसल्यास योजना सुरु झालेपासून १५ दिवसांचे आंत कार्यालय कार्यान्वीत करावे व त्याबाबतचा अहवाल संबंधित विभागीय कृषी सहसंचालक यांना सादर करावा.

३. विमा कंपनीने त्यांचेकडे प्राप्त प्रस्तावांची नोंदणी विशिष्ठ पध्दतीने Application ID (YY/MM/four digit uniqueTahsil Code/Three Digit Sr.No.; For Ex.१९१२४२०८००१) चा वापर करुन करावी जेणेकरुन सदर प्रकरणांची सदयस्थिती तात्काळ अवगत होईल.

४. विमा कंपनीने विमा प्रस्ताव कंपनीस प्राप्त झाल्यानंतर पोर्टलव्दारे एसएमएस व्दारे संबंधितांना अर्ज प्राप्त झाल्याचे तत्काळ कळवावे.

५. विमा कंपनीने/ कंपन्यांनी पॉलिसी करारातील/ई-निविदेतील तरतुदी, अटी व शर्ती आणि शासन निर्णयातील विहित मार्गदर्शक सूचनांनुसार विमा दावे विहीत मुदतीत मंजूर करावेत.

६. विमा सल्लागार कंपनीने सादर केलेला प्रस्ताव तपासून परिपूर्ण प्रस्ताव स्वीकारून पोहोच द्यावी. त्यावर २१ दिवसात निर्णय घेऊन विमा भरपाई रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या /वारसदारांच्या आधार लिंक्ड बँक खात्यात डी.बी.टी./ई सी एस ने जमा करावी.

७. विमा सल्लागार कंपनीने सादर केलेल्या अर्जाची छाणनी करावी. सदर अर्जामध्ये एकापेक्षा जास्त वेळा त्रृटी काढण्यात येऊ नये.

८. विहित २१ दिवसांच्या मुदतीत प्रकरण पडताळणीच्या नोंदी विमा पोर्टलवर विमा कंपनीकडून नोंदवल्या जातील आणि दंडात्मक कार्यवाहीसाठी याच नोंदी ग्राह्य धरण्यात येतील.

९. विमा कंपन्यांना सुस्पष्ट कारणांशिवाय विमा प्रस्ताव नाकारता येणार नाहीत. विमा कंपन्यांनी नामंजूर विमा दाव्या प्रकरणी सुस्पष्ट कारणमीमांसा संबंधित शेतकऱ्यांना कटाक्षाने मराठी भाषेतच कळविणे व त्याची प्रत विमा सल्लागार कंपनी /आयुक्त (कृषी) /संबंधित विभागीय कृषी सहसंचालक/ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी /तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे पाठविणे व विमा संगणक प्रणालीमध्ये नोंदी घेणे अनिवार्य आहे.

१०.विमा प्रस्तावात त्रुटी असल्यास त्याबाबतचे पत्र संबंधित अर्जदारास पोहोच करावे व त्याची प्रत विमा सल्लागार कंपनी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना द्यावी. परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून २१ दिवसांच्या आत उचित कार्यवाही (मंजूरी,नामंजूरी,त्रुटी कळवणे )न केल्यास तीन महिन्यांपर्यंत दावा रकमेवर दरमहा ९ टक्के व त्यानंतर पुढे १५ टक्के व्याज देय राहील.

११.प्रकरण मंजूर केल्यावर पंधरा दिवसांच्या आत अनुदेय नुकसान भरपाई संबंधित लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा तीन महिन्यांपर्यंत दावा रकमेवर दरमहा ९ टक्के व त्यानंतर पुढे १५ टक्के व्याज देय राहील.

१२.परिपूर्ण विमा दावा विमा कंपनीकडे सादर झाल्यापासून त्यावर २१ दिवसांच्या आत कार्यवाही करणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील. मात्र तरीही विमा कंपनीने कागदपत्रांची पूर्तता झालेल्या प्रकरणी मंजुरीयोग्य प्रस्ताव नाकारल्यास, विमा सल्लागार कंपनीने शेतकऱ्यांच्या वतीने इर्डा ग्राहक तक्रार कक्ष /विमा न्यायाधीश /जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच/राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग/ न्यायालय येथे दावे दाखल करेल.

१३.शेतकऱ्यांचा विमा प्रस्ताव विहित कागदपत्रांसह विमा योजनेच्या कालावधीत कधीही प्राप्त झाला तरी तो विचारात घेणे विमा कंपनीला बंधनकारक राहील.

१४.तथापि विमा पॉलिसी कालावधीच्या अखेरच्या दिवसात झालेल्या अपघातासाठी योजनेचा कालावधी संपल्यापासून ९० दिवसांपर्यंत पूर्वसूचना प्राप्त होणारे व संगणक प्रणालीमध्ये विहित कालावधीत कागदपत्रांसह नोंद झालेल्या पूर्वसूचना पत्रानुसार विमा प्रस्तावसुध्दा स्विकारणे विमा कंपनीस बंधनकारक राहील.

१५.याशिवाय समर्थनीय कारणांसह विमा संरक्षित कालावधी संपल्याच्या दिवसापासून ३६५ दिवसांपर्यंत तालुका कृषि अधिकारी यांचेकडे विहित कागदपत्रांसह प्राप्त होणारे प्रस्तावसुध्दा (पूर्वसूचना नव्हे ) जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीच्या शिफारशीने स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील. मात्र सदर कालावधीनंतर कोणताही प्रस्ताव स्विकारला जाणार नाही व असे कोणतेही प्रस्ताव लाभास पात्र असणार नाहीत.

१६.विमा प्रस्तावांची सदयस्थिती अपघातग्रस्त कुटुंबास अवगत करणेसाठीची संगणक प्रणाली,मोबाईल एस एम एस सुविधा उपलब्ध करणे विमा कंपनीस बंधनकारक राहील.

१७.प्रपत्र - ड मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या आधारित विम्याची रक्कम अदा करावी. दुर्घटना सिद्ध होत असेल व अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या कागदपत्रांची पूर्तता होऊ शकत नसेल तर पर्यायी दाखल्याबाबत जिल्हा संनियंत्रण समितीशी विचारविनिमय करून पूर्तता करून घेऊन विम्याची रक्कम अदा करावी.

१८. अपघातग्रस्त वाहन चालकाच्या चुकीमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास /अपंगत्व आल्यास दोषी वाहन चालक वगळता, सर्व अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे ,केवळ अपघात झाला या कारणास्तव, विम्याचे दावे मंजूर करावेत.

१९.अपघाती मृत्यू संदर्भात दुर्घटना घडल्याचे सिद्ध झाल्यास अनावश्यक धोका पत्करला या कारणास्तव एकही प्रकरण नाकारता येणार नाही.

२०.जर शेतकऱ्याचा मृत्यू वाहन अपघातामुळे झाला असेल व अपघात ग्रस्त शेतकरी स्वतः वाहन चालवत असेल तर अशा प्रकरणी वाहन चालवण्याचा परवाना सादर करणे आवश्यक राहील.

२१.अपघातग्रस्त वाहन चालकाच्या वाहनचालक परवान्याचा चालकाव्यतिरिक्त इतर अपघातग्रस्त शेतक-यांच्या विमा प्रस्तावांशी कोणताही संबंध असणार नाही.

२२.अपघातग्रस्ताचे निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस दाव्याची रक्कम पुढील प्राथम्यक्रमानुसार अदा करावी -

(१) अपघातग्रस्ताची पत्नी/अपघातग्रस्त स्त्रीचा पती, (२) अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी, (३) अपघातग्रस्ताची आई, (४) अपघातग्रस्ताचे मुलगा, (५) अपघातग्रस्ताचे वडिल, (६) अपघातग्रस्ताची सून, (७) अन्य कायदेशीर वारसदार.

२३. सदर योजनेच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या माहिती अधिकार कायदयांतर्गत प्रकरणांचा निपटारा करणेसाठी जन माहिती अधिका-याची तसेच अपीलीय अधिकारी यांची नेमणूक करणे बंधनकारक आहे.

८. **<u>न्यायालयीन क्षेत्र</u> (<u>Judicial Jurisdiction</u>)** :–

विमा दाव्यासाठी ग्राहक मंचाचे कार्यक्षेत्र - संबंधित जिल्ह्याचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच (District Consumer Redressal Forum) हे त्या जिल्ह्यातील विमा दाव्यांसाठी न्यायालयीन क्षेत्र (Jurisdiction) राहील.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचे कल्याणकारी स्वरूप विचारात घेता व सदर योजना विमा कंपन्या व विमा सल्लागार कंपन्यांमार्फत राबविण्यात येत असल्याने कोणत्याही न्यायालयीन प्रकरणी शासनास प्रतिवादी करता येणार नाही. तसेच शासनावर नुकसान भरपाई दायित्व निश्चित करता येणार नाही. तसेच योजना राबविताना उचित हेतूने केलेल्या कार्यवाही बाबत शासकीय अधिकारी,कर्मचाऱ्यांवर नुकसान भरपाईचे आर्थिक दायित्व असणार नाही.

९. **<u>इतर महत्वाच्या अटी :-</u>**

९.१ शासन, विमा सल्लागार कंपनी/ कंपन्या व विमा कंपनी/ कंपन्या यांच्यामधील त्रिपक्षीय करारामध्ये अथवा विमा पॉलिसी मध्ये काहीही नमूद केलेले असले तरी सदर योजनेच्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व मार्गदर्शक सूचना विमा सल्लागार कंपनी व विमा कंपनी /कंपन्यांना बंधनकारक असतील.

९.२ योजना सुरू असलेल्या कालावधी साठी विमा हप्ता देण्याची जबाबदारी शासनाची असेल व देय विमा दावे अदा करण्याची जबाबदारी विमा कंपनीची/कंपन्यांची राहील.

९.३ विमा कंपनीचे काम समाधानकारक नसल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस देऊन नियुक्ती रद्द करण्याची व त्यापुढील विमा कालावधीची विमा हप्त्याची रक्कम यथाप्रमाणानुसार (Pro-rata Basis)वार्षिक विमाहप्ता दर विचारत घेउन प्रति दिन प्रति लाभार्थी येणारी विमा हप्त्याची रक्कम परत घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

९.४ अपुऱ्या कागदपत्रांमुळे प्रलंबित राहिलेल्या /नाकारलेल्या प्रस्तावां प्रकरणी कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी विमा सल्लागार कंपनीची असून त्यांनी विभागीय कृषी सहसंचालक/ जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी /तालुका कृषी अधिकारी यांचे सहकार्याने ती पार पाडणे आवश्यक आहे.

**१०.<u>योजनेचे संनियंत्रण:-</u>**

(१) **<u>राज्यस्तरीय समिती:</u>** या योजनेंतर्गत राज्यस्तरीय समिती प्रधान सचिव (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येत आहे. या समितीची रचना व कार्ये पुढीलप्रमाणे असतील.

| | |
|---|---|
| १.अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव (कृषि) | : अध्यक्ष |
| २. अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव (महसुल) | : सदस्य |
| ३. अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव (नियोजन) | : सदस्य |
| ४. अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव (गृह) | : सदस्य |
| ५. अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव (वित्त) | : सदस्य |
| ६. अ.मु.स./ प्रधान सचिव/सचिव (आरोग्य ) | : सदस्य |
| ७. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य | : सदस्य |
| ८. उपसचिव (कृषि) महाराष्ट्र शासन | : सदस्य सचिव |

**<u>राज्यस्तरीय समितीची कार्ये:</u>**

१. योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे.

२.आयुक्त कृषी यांचेमार्फत मागविणेत आलेल्या ई निविदेमधून योजना कार्यान्वयीन यंत्रणेची निवड करणेबाबत कार्यवाही करणे इ. बाबत निर्णय घेणे.

३. योजनेच्या अंमलबजावणीवेळी येणाऱ्या विविध अडचणीच्या संदर्भात विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

४. योजनेच्या अंमलबजावणीबाबत सहामाही आढावा घेणे.

**(२) <u>जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती:</u>**

योजनेच्या प्रभावी संनियंत्रणासाठी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे जिल्हा सनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी ( जिल्हा परिषद ) | सदस्य |
| ३. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |
| ४. | विमा सल्लागार कंपनी विभाग प्रमुख | सदस्य |
| ५. | संबंधित विमा कंपनीचे अधिकारी | सदस्य |
| ६. | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची कार्ये:**

१. समितीची त्रैमासिक बैठक घेण्यात यावी व त्यामध्ये जिल्ह्यातील प्रकरणांचा आढावा घ्यावा.
२. योजनेअंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत विमा कंपनी, लाभार्थी अथवा शासकीय यंत्रणा यामध्ये वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत समाधानकारक तोडगा काढणे.
३. कागदपत्रांचे पुर्ततेसाठी प्रलंबित प्रकरणांबाबत आवश्यक कागदपत्र उपलब्ध करुन देणेसाठी संबंधित यंत्रणांस सुचना देणे.
४. प्रलंबित/अनिर्णीत/विवादास्पद/ शिवाय समर्थनीय कारणांसह विमा पॉलिसीचा कालावधी संपल्याच्या दिवसापासून ३६५ दिवसांपर्यंत तालुका कृषि अधिकारी यांचेकडे प्राप्त होणारे विमा प्रस्तावां प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात यावा. समितीचे निर्णयानुसार अंमलबजावणी करणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील.
५. विमा कंपनीने नामंजूर केलेल्या प्रकरणात विमा सल्लागाराचे प्रस्तावानुसार सदर प्रकरणे पुनः पडताळणीसाठी विमा कंपनीला पाठवणे.

(३) **तालुकास्तरीय समिती:-**

योजनेच्या प्रभावी संनियंत्रणासाठी तालुका स्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे तालुका सनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

१. तहसिलदार : अध्यक्ष
२. गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद : सदस्य
३. विमा सल्लागार कंपनी कंपनीचे प्रतिनिधी : सदस्य
४. संबंधित विमा कंपनीचे प्रतिनिधी : सदस्य
५. तालुका कृषि अधिकारी : सदस्य सचिव

**तालुकास्तरीय समितीने पार पाडावयाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. योजनेसंबंधी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करणे व प्रतिमहा आढावा बैठक घेणे.
२. विमा प्रस्तावातील कागदपत्रांच्या त्रुटी पुर्ततेसाठी संबंधित यंत्रणांना निमंत्रित करुन योग्य त्या सुचना द्याव्यात
३. आवश्यकतेनुसार तक्रारींबाबत पडताळणी करुन जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीस शिफारस करणे.

**११.गैर प्रकरणात कारवाई करणे:-**

चुकिच्या कागदपत्रांच्या आधारे विम्याची प्रकरणे केल्याचे पुराव्यानिशी निदर्शनास आल्यास, अशा प्रकरणात जिल्हा संनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनानुसार कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाअधिक्षक कृषि अधिकारी/ तहसिलदार यांची राहिल.

**१२.संकेतस्थळाचा तपशील -**

- सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे हेतूने प्रणाली विकसीत करण्यात येईल.
- याद्वारे शेतकरी,कार्यान्वयीन यंत्रणा व शासन यांना पारदर्शक पध्दतीने सेवा उपलब्ध होउ शकेल तसेच योजनेचे सनियंत्रण अधिक प्रभावीपणे करता येणे शक्य होईल.
- शेतकरी अपघाताबाबत त्वरीत पूर्वसुचना नोंदविणे,त्यानुसार क्षेत्रिय यंत्रणेमार्फत प्रस्ताव तयार करुन अपलोड करणे,प्रस्तावाबाबतची सद्यस्थिती (मंजूरी,नामंजूरी,त्रुटी )जाणून घेणे व त्याअनुषंगाने त्रुटीपुर्तता लवकरात लवकर करणे या सर्व बाबी संगणक प्रणालीद्वारे गतिमान करता येतील.

**१३.**राज्यस्तरावर सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुक्त, कृषि हे सनियंत्रण व पर्यवेक्षण करतील.

**१४.** सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विमा संरक्षणामध्ये समाविष्ठ नसणाऱ्या बाबी व अन्य आवश्यकतेनुसार सुचना आयुक्त (कृषि) निर्गमित करतील.

**१५.** सदर नवीन योजनेची अंमलबजावणी चालु योजनेचा कालावधी संपल्यानंतर तत्काळ करण्यात येईल.

**१६.** सदर योजनेत कोणतेही बदल/ सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील.

प्रस्तुत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेताक २०१९०९२०१८१८२५५४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Neeta Eknath Shinde

Digitally signed by Neeta Eknath Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f2bffd6992498e56663024368c72b33364cfb066d53682c53a425e54d187a7c1, serialNumber=f325d659f47933958aa2d98f394db95f94be57548776492ba36e77ea1c4aa53b, cn=Neeta Eknath Shinde
Date: 2019.09.20 18:10:59 +05'30'

**( निता शिंदे )**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३) मा.मंत्री (कृषि)यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी
५) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी
६) मा.राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी
७) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी
८) सर्व मा.विधानसभा सदस्य
९) सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१०) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
११) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुमविभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२) अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) अप्पर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१७) प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृहविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई प्रसिध्दीच्या विनंतीसह

१९) सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
२०) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२५) सर्व जिल्हा परिषदांचे, जिल्हा कृषि विकास अधिकारी
२६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), मुंबई.
२७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखावअनुज्ञेयता ), मुंबई
२८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), नागपूर
२९) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखावअनुज्ञेयता),नागपूर
३०) संचालक, लेखावकोषागारे, मुंबई
३१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
३३) ग्रंथालय प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
३४) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-
३५) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६) सर्व तहसिलदार
३७) सर्व उप विभागीय कृषि अधिकारी
३८) सर्व तालुका कृषि अधिकारी
३९) सर्व उपसचिव /अवरसचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४०) सर्व मंत्रालयीन विभाग
४१) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांची मध्यवर्ती कार्यालये
४२) निवडनस्ती, कार्यासन ११-अे.

<u>हस्ते बटवडा</u>

सहपत्र क्र.१ - पुर्वसुचना अर्ज

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**

**क्लेम फॉर्म भाग-१**

**प्रति,**

**संबंधित विमा कंपनी**
**व्दारा तालुका कृषि अधिकारी,**
**तालुका..........................जिल्हा............................**

**महोदय,**

**१) अर्जदाराचे नाव ........................................................................**

**२) अर्जदाराचे अपघातग्रस्ताशी नाते**
**(मोबाईल क्र./दूरध्वनी क्र.) ..................................................................**

**३) अपघातग्रस्तांचे नांव व पत्ता ............................................................**

**४) अपघात दिनांक ..................................................................**

**५) अपघाताचे स्वरुप ..................................................................**

**६) कोणत्याही एका शेतजमीनीचा धारण केलेला तपशील** — **सर्व्हे नं. / गट .......................** **गावाचे नाव ................................**

**७)** कार्यान्वित असलेल्या आधार लिंक्ड बँक खात्याचा तपशील (जनधन खात्याचा तपशिल देउ नये)

१) अर्जदाराचे खाते असलेल्या बँकेचे नांव ............................................

२) बचत खाते क्र. ..................................................................

३) शाखा व शाखा क्र. ..................................................................

४) आय एफ एस कोड ..................................................................

मी खाली सही करणार अर्जदार नमूद करतो की, उपरोक्त माहिती खरी असून उपरोक्त अपघातग्रस्त शेतकरी / वारसदार म्हणून रु.२,००,०००/-किंवा रु.१,००,०००/- एवढया **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेखालील रकमेच्या दाव्यासाठी अर्ज करीत आहे/आहोत. कृपया सदर दावा निकाली काढून दाव्याची रक्कम उपरोक्त नमूद बँक खात्यात जमा करण्यात यावी, ही विनंती.**

**सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करीत आहे.**

**( अर्जदाराची सही )**

पुर्वसुचना अर्ज

**क्लेम फॉर्म भाग-१ चे सहपत्र**

| अ.क्र. | तपशील | जोडलेली कागदपत्रे | तालुका कृषि अधिकारी यांचा शेरा |
|---|---|---|---|
| १ | ७/१२ उतारा (मूळ प्रत) | | |
| २ | गाव नमूना नं.६ ड, (ज्या फेरफार नोंदीव्दारे ७/१२ वर नाव आले.) अथवा सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे फेरफार नोंदीबाबत प्रमाणपत्र(मूळ प्रत) | | |
| ३ | गाव नमूना नं.६-क अथवा सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे वारसाच्या नोंदीबाबत प्रमाणपत्र (मुळ प्रत) | | |
| ४ | प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-ग) (मूळ प्रत) | | |
| ५ | वयाचा पुरावा (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | |
| ६ | शिधापत्रिका (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | |
| ७ | मृत्यू दाखला /अपंगत्वाचा दाखला (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | |
| ८ | प्रथम माहिती अहवाल (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | |
| ९ | घटनास्थळ पंचनामा (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | |
| १० | अपघाताचे स्वरुपानूसार प्रपत्र-क मधील इतर कागदपत्रे (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | |
| | १) | | |
| | २) | | |
| | ३) | | |
| | ४) | | |
| | ५) | | |
| | ६) | | |

<u>**हस्ते बटवडा**</u>

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**

**क्लेम फॉर्म भाग**–२

तालुका कृषि अधिका-याचे पत्र

जा.क्र. गोमुंशवियो/ २० .............................
तालुका कृषि अधिकारी,----------जि. ------
दिनांक......./........../............

प्रति
---------------------------------------
..................... जिल्हा प्रतिनिधी

विषय :- **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०-- /२० --**

**महोदय,**

**श्री.........................................रा.............................. ता..................................**

**जिल्हा..................... यांचा क्लेम फॉर्म भाग**–१ मधील अर्ज सोबत जोडला आहे. सविस्तर तपशील अर्जात नमूद आहे. अर्जासोबतची सांक्षाकीत कागदपत्रे स्वीकारताना मूळ कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयाने केली आहे.

(जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत रवाना)

सोबत :- १) मूळ दावा अर्ज
२) अपघाताचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे
(क्लेम **फॉर्म भाग**–३ व ४ चे सहपत्रात उल्लेखीत)

**तालुका** कृषि अधिकारी
ता ...................... जि. .........................

**<u>हस्ते बटवडा</u>**

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**
**क्लेम फॉर्म भाग – ३**

क्रमांक................................
दिनांक.............................

प्रति
संबंधित विमा कंपनी प्रा.लि.
पत्ता ...........................

विषय :- **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजने अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याबाबत...**

**महोदय,**

**श्री.........................................रा.............................. ता..................................**
**जिल्हा..................... यांचा क्लेम फॉर्म भाग** – १ मधील अर्ज सोबत जोडला आहे. सविस्तर तपशील अर्जात नमूद आहे. अर्जासोबतची सांक्षाकीत कागदपत्रे स्वीकारताना मूळ कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयाने केली आहे.

( )

मे.--------- इन्शुरन्स ब्रोकरेज कंपनी प्रा.लि.
जिल्हा कार्यालय पत्ता..................

सोबत :- १) मूळ दावा अर्ज
२)७ / १२, ६-ड (फेरफार) व ६-क चा उतारा
३) तालुका कृषि अधिका-यांचे प्रमाणपत्र
४) अपघाताचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे
(क्लेम **फॉर्म भाग** – २ व ३ चे सहपत्रात उल्लेखीत)

| Application ID | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |

**(विमा कंपनीने नोंदवावा )**

क्लेम फॉर्म भाग-१ चे सहपत्र गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना
क्लेम फॉर्म भाग–२ व ३ चे सहपत्र

| अ.क्र. | तपशील | तपासणी अधिका-याचा अहवाल | | |
|---|---|---|---|---|
| | | तालुका कृषि अधिकारी | विमा सल्लागार प्रतिनिधी | विमा कंपनी |
| १ | ७/१२ उतारा (मूळ प्रत) | | | |
| २ | गाव नमूना नं.६ ड, (ज्या फेरफार नोंदीव्दारे ७/१२ वर नाव आले.) अथवा सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे फेरफार नोंदीबाबत प्रमाणपत्र(मूळ प्रत) | | | |
| ३ | गाव नमूना नं.६-क अथवा सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे वारसाच्या नोंदीबाबत प्रमाणपत्र (मुळ प्रत) | | | |
| ४ | प्रतिज्ञापत्र (प्रपत्र-ग) (मूळ प्रत) | | | |
| ५ | वयाचा पुरावा (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | | |
| ६ | शिधापत्रिका (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | | |
| ७ | मृत्यू दाखला /अपंगत्वाचा दाखला (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | | |
| ८ | प्रथम माहिती अहवाल (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | | |
| ९ | घटनास्थळ पंचनामा (स्वयंसांक्षाकीत प्रत) | | | |
| १० | अपघाताचे स्वरुपानूसार प्रपत्र-क मधील इतर कागदपत्रे (सांक्षाकीत प्रत) | | | |
| | १) | | | |
| | २) | | | |
| | ३) | | | |
| | ४) | | | |
| | ५) | | | |
| | ६) | | | |

स्वाक्षरी — तालुका कृषि अधिकारी
स्वाक्षरी — विमा सल्लागार कंपनी प्रतिनिधी
स्वाक्षरी — विमा कंपनी

**प्रपत्र - क**

**अपघाताच्या घटनेच्या स्वरुपानुसार पुराव्यादाखल सादर करावयाची कागदपत्रे**

| अ.क्र | अपघाताचे स्वरुप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | रस्ता / रेल्वे अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,विमा संरक्षित व्यक्ती वाहन चालविताना अपघात झाल्यास त्याचा मोटार वाहन परवाना |
| २ | पाण्यामध्ये बुडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,बुडून बेपत्ता झाल्यास फक्त प्रथम माहिती अहवाल व क्षतीपूर्ती बंधपत्र आवश्यक) |
| ३ | जंतूनाशक अथवा अन्य कारणामुळे विषबाधा | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,रासायनिक विश्लेषण अहवाल(व्हिसेरा अहवाल) |
| ४ | विजेचा धक्का अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ५ | वीज पडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ६ | खून | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,रासायनिक विश्लेषण अहवाल(व्हिसेरा अहवाल),दोषारोप पत्र |
| ७ | उंचावरुन पडून झालेला मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,पोलीस अंतिम अहवाल |
| ८ | सर्पदंश/विंचू दंश | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,वैद्यकीय उपचारापूर्वीच निधन झाल्याने पोस्ट मॉर्टेम झाले नसल्यास या अहवालातून सूट मात्र वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र शासकीय आरोग्य केंद्र अधिका-याकडून प्रतिस्वाक्षरीत असणे आवश्यक |
| ९ | नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,नक्षलवादी हत्येसंदर्भातील कार्यालयीन कागदपत्र |
| १० | जनावरांच्या हल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी / मृत्यू | |
| | अ) जनावरांच्या चावण्यामुळे रेबीज होऊन मृत्यू | औषधोपचाराची कागदपत्रे |
| | ब) जखमी होऊन मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| | क) जनावरांच्या हल्ल्यात मृत्यू होऊन शव न मिळणे | क्षतिपूर्ती बंधपत्र आवश्यक |
| ११ | दंगल | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,दंगलीबाबतची कार्यालयीन कागदपत्रे |
| १२ | अन्य कोणतेही अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,पोलीस अंतिम अहवाल |
| १३ | अपंगत्वाच्या लाभाच्या पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | १)अपंगत्व अथवा अवयव निकामी होण्याचे कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र अथवा दवाखान्याच्या नोंदी.<br>२) प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अंपगत्वाचे प्रमाणपत्र. |

**सुचना ::**

- वरील कागदपत्र मूळ किंवा राजपत्रित अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेले अथवा स्वयंसाक्षांकित (घोषणापत्र-ब नुसार) असल्यास ग्राहय धरण्यात येईल.
- मृत्यूच्या कारणाची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने स्पष्ट केली असल्यास रासायनिक विश्लेशन अहवाल (व्हिसेरा अहवाल) या कागदपत्रांची आवश्यकता राहणार नाही.

**प्रपत्र - ग**

**घोषणापत्र - अ**

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**

| **स्वयंघोषणापत्र**<br>**अर्जदाराचा फोटो** |
|---|

मी खाली सही करणार -----------------------------------रा.---------------तालुका --------- -जिल्हा ---------------- वय----- वर्षे, आधार क्रमांक (असल्यास)------------------------------- व्यवसाय--------याद्वारे घोषित करतो/करते की, खालील लिहिलेला मजकूर माझे सद्सदविवेक बुध्दीस स्मरुन लिहिलेला असून खरा आहे.

श्री./श्रीमती------------------------------------------ हे दिनांक / /२० रोजी गांव ---------------ता. ------------जि. -------------- येथे अपघाताने अपंग/ मयत झाले आहेत. त्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ मिळावा म्हणून मी अर्ज केलेला आहे. त्यासाठी क्लेम फॉर्म (भाग-१) मी भरला असून त्यातील तपशिल खरा आहे. सदर क्लेम फॉर्म (भाग-१) च्या अनुषंगाने सादर केलेली महसूल व इतर सर्व कागदपत्रे खरी आहेत व त्यातील माहितीही खरी आहे. मृत व्यक्ती शेतकरी / शेतकरी कुटुंबातील सदस्य आहे. सदर योजनेंतर्गत लाभास पात्र असणाऱ्या शेतकऱ्याने/ कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने/ शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतलेला नाही.

क्लेम फॉर्म (भाग-१) सोबत जोडलेली मूळ कागदपत्रे व साक्षांकित कागदपत्रे खरी असून त्यात मी कोणतीही खाडाखोड केलेली नाही अथवा बदल केलेला नाही.

वरील प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर खरा व बरोबर असून तो असत्य नाही. तो असत्य निघालेस होणाऱ्या कारवाईस मी पात्र राहीन तसेच भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :.........................

दिनांक :..........................

अर्जदाराची सही :..................................

अर्जदाराच नाव ..........................................

अपघातग्रस्त व्यक्तीशी नाते ............................

**घोषणापत्र - ब**

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**

**स्वयंसाक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र**

| |
|---|
| **अर्जदारा चा फोटो** |

मी खाली सही करणार ----------------------------------------रा.-------------------तालुका ---------- --जिल्हा ---------------- वय----- वर्षे, आधार क्रमांक (असल्यास)------------------------------ व्यवसाय--------याद्वारे घोषित करतो/करते की, श्री./श्रीमती ------------------------------------ --------- हे दिनांक / / रोजी गांव ---------------ता. ------------ जि. -------------- येथे अपघाताने अपंग/ मयत झाले आहेत. त्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ मिळावा म्हणून मी अर्ज केलेला असून अर्जासोबत जोडलेल्या स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड संहिता आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :.........................

दिनांक :...........................

अर्जदाराची सही :..................................

अर्जदाराचे नाव ............................................

अपघातग्रस्त व्यक्ती